जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८०४ दिनांक - ११/११/२०२३**

मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

## अग्निशस्त्र बाळगणा-या आरोपीस अटक करुन गावठी पिस्टलासह जिवंत काडतुस केले जप्त

दि.०७/११/२०२२ रोजी वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु ताम्हाणे यांचे आदेशाने मुंढवा तपास पथक अधिकारी व अंमलदार हे मुंढवा पोलीस ठाणे हददीत येणाऱ्या दिवाळी सणाचे अनुशंगाने गुन्हे प्रतिबंध गस्त करीत असताना मुंढवा **तपास पथकातील अंमलदार दिनेश राने व स्वप्नील रासकर यांना त्यांचे गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की** इसम नामे आदीत्य महेश चौधरी वय २१ वर्षे रा महात्मा फुले वसाहत १३,ताडीवाला रोड पुणे.ृहा मुंढवा पोलीस ठाणे हददीत फिरत असुन त्याचेजवळ तो गावठी पिस्टल बाळगुन आहे.वरील मिळालेल्या बातमीची खात्री करुन कार्यवाही करण्याबाबतचे आदेश वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.विष्णु ताम्हाणे यांनी दिलेवर मुंढवा तपास पथक अधिकारी सपोनी श्री.संदीप जोरे व स्टाफ जाहागिंर चौक ते आंबेडकर चौक,घोरपडी, मुंढवा,पुणे या रस्त्यावर जावुन मिळालेल्या बातमीप्रमाणे इसम नामे **आदीत्य महेश चौधरी वय २१ वर्षे रा महात्मा फुले वसाहत १३,ताडीवाला रोड पुणे**.यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याचेकडुन **एक गावठी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत काडतुस** जप्त करण्यात आले आहे.सदर आरोपी विरुध्द मुंढवा पोलीस ठाणे गुर नं ३६३/२०२३ आर्म ॲक्ट कलम ३,(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)सह १३५,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात असुन गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ५ पुणे शहर,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर.श्रीमती अश्विनी राख, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,मुंढवा पोलीस ठाणे पुणे,श्री.विष्णु ताम्हाणे, पोलीस निरीक्षक(गुन्हे),श्रीमती संगिता रोकडे, तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक संदिप जोरे, पो.अमंलदार दिनेश राणे,संतोष काळे,स्वप्नील रासकर,दिनेश भांदुर्गे,राहुल मोरे,सचिन पाटील यांनी केली आहे.


मुंढवा पोलीस स्टेशन
पुणे शहर